साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
● संपादक : बिलाल शेख ●
VISHVANAYAK
Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - २२ ■ मंगळवार दि.२६ मे २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 22 ■ Tuesday Dt. 26 May 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## सिंधफणेच्या काठावर मानवी कवटी, शरीराचा सापळा आढळल्याने खळबळ

**माजलगाव । प्रतिनिधी**
तालुक्यातील डुब्बा मांजरा गावालगत वाहणाऱ्या सिंदफणा नदीच्या पात्रात एका महिलेचा सांगाडा आढळून आल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नदीकाठी सरपण आणण्यासाठी गेलेल्या ग्रामस्थांना हा सांगाडा दिसून आला.
मिळालेल्या माहितीनुसार, डुब्बा मांजरा गावाजवळील सिंदफणा नदीकाठी काही ग्रामस्थ सरपण गोळा करण्यासाठी गेले असता झाडाझुडपांमध्ये मानवी सांगाड्यासारखी वस्तू आढळली. जवळ जाऊन पाहिले असता तो मानवी सांगाडा असल्याचे स्पष्ट झाले. ही माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली.
घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून सांगाडा ताब्यात घेतला. प्राथमिक तपासात सांगाड्यावर काळ्या रंगाचा ब्लाउज आढळून आल्याने तो महिलेचा असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. तसेच मृतदेहाला सुमारे तीन ते चार महिने उलटले असावेत, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

## संतोष देशमुख प्रकरणाची भीषण पुनरावृत्ती!

# दलित तरुणाला दाव्याने बांधून निर्दयीपणे हत्या!

## गोरे वस्तीतील अमानुष घटनेने जिल्हा हादरला; मुख्य आरोपी शेख इरफानविरुद्ध खून आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल!

**बीड । प्रतिनिधी**
बीड जिल्हा शांत होत नाही तोच पुन्हा एकदा एका अमानुष, क्रूर आणि काळजाचा थरकाप उडवणाऱ्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. काही महिन्यांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या संतोष देशमुख प्रकरणाची अत्यंत भीषण आणि क्रूर पुनरावृत्ती थेट बीड शहरात घडली आहे. बीडच्या गोरे वस्ती भागातील उमेश दळवी या एका निष्पाप दलित तरुणाला गुरांसारखे दाव्याने (दोरीने) बांधून, अत्यंत निर्दयीपणे आणि अमानुषपणे मारहाण करून त्याचा जीव घेण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या पाशवी कृत्यामुळे बीडकरांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाल्याचे चित्र आहे.



मयतच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ मे २०२६ रोजी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी मुख्य आरोपी शेख इरफान शेख समद उर्फ लाला याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपीने उमेश दळवी याला कोंडून ठेवून, त्याला दाव्याने (दोरीने) बांधले आणि लाथाबुक्क्यांसह बेदम मारहाण केली. हा हल्ला इतका भीषण होता की, गंभीर जखमी झालेल्या उमेशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.




शिवाजीनगर पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपी शेख इरफान उर्फ लाला याच्यावर भारतीय न्याय संहिता आणि ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत अत्यंत कडक कलमे लावली आहेत. गुन्हा रजि. नं.: १२४/२०२६ (दिनांक २४ मे २०२६)लागलेली कलमे:१०३(१): खून ११५(१): स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे
३५१(२) आणि ३५२: गंभीर धमकी आणि गुन्हेगारी कृत्य३(१)(ी), ३(१)(ी): अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ट्रॉसिटी) अंतर्गत जाहीर अपमान आणि जातीवाचक शिवीगाळ करणे अशा गंभीर कलमानुसार शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे शिवाजीनगर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, बीडमध्ये तणावपूर्ण शांतता आहे.

### कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; बीडमध्ये तीव्र संताप!

संतोष देशमुख प्रकरणात ज्या पद्धतीने कायदा हातात घेतला गेला होता, अगदी तसाच क्रूर पॅटर्न उमेश दळवीच्या बाबतीत राबवण्यात आल्याने दलित संघटना आणि सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. एका तरुणाला दाव्याने बांधून मारण्याची हिंमत आरोपीमध्ये येतेच कशी? बीडमध्ये कायद्याचा धाक उरला आहे की नाही? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.या प्रकरणातील मुख्य आरोपी शेख इरफान याला तात्काळ बेड्या ठोकून, उमेश दळवीला न्याय द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### संतोष देशमुख 'पॅटर्न'मुळे बीडमध्ये प्रचंड असंतोष!

काही महिन्यांपूर्वी बीडमध्ये संतोष देशमुख प्रकरणात ज्या पद्धतीने कायदा हातात घेऊन क्रूरता केली गेली होती, अगदी तसाच भीषण पॅटर्न उमेश दळवीच्या बाबतीत राबवण्यात आल्याचे समोर आल्याने दलित संघटना आणि सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. एका दलित तरुणाला गुरांसारखे दाव्याने बांधून मारण्याची हिंमत आरोपीमध्ये येतेच कशी? बीडमध्ये गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला आहे की नाही? पोलीस प्रशासनाचा वचक कुठे गेला? असा संतप्त सवाल आता सामाजिक कार्यकर्त्यांमधून आणि सामान्य जनतेतून विचारला जात आहे.

### फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवण्याची मागणी!

या अमानुष प्रकरणातील मुख्य आरोपी शेख इरफान याला तात्काळ बेड्या ठोकून, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा आणि नराधम आरोपीला फाशीची शिक्षा देऊन उमेश दळवीच्या कुटुंबाला तात्काळ न्याय द्यावा, अशी मागणी आता सर्व स्तरातून जोर धरू लागली आहे. सध्या शिवाजीनगर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, अनुचित प्रकार टाळण्यासाठी बीड शहरात तणावपूर्ण शांतता आणि चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## चकलंबा पोलीस स्टेशनच्या आशीर्वादाने वाळू माफियांचा धुमाकूळ?

**चकलांबा । प्रतिनिधी**
बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी धाडसी पावले उचलली आहेत. मात्र दुसरीकडे चकलांबा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीचा खुलेआम धुमाकूळ सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. परिसरात दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा व वाहतूक सुरू असून संबंधित विभागांकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.
स्थानिकांच्या माहितीनुसार, गेल्या महिनाभरापासून चकलांबा परिसरात दररोज तीस ते चाळीस हायवा वाळूची वाहतूक होत आहे. गोदावरी नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा सुरू असून संबंधित विभागांना वारंवार माहिती देऊनही कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.वाळू माफियांना चकलांबा पोलीस स्टेशन तसेच महसूल विभागातील काही




अधिकाऱ्यांचे पाठबळ मिळत असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. त्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोबल वाढले असून सर्वसामान्य नागरिक मात्र त्रस्त झाले आहेत.
दरम्यान, मंडळ अधिकारी काळे यांना एका घरकुलधारकाने वाळू संदर्भात फोनद्वारे विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. माझ्या हातात वाळूचे काही नाही, असे उत्तर दिल्याने घरकुलधारकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तहसीलदार खोमणे साहेबांनी याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी व घरकुलधारकांनी वाळू कुठून घ्यावी, याची माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी होत आहे. शासनाने घरकुलधारकांना पाच ब्रास मोफत वाळू देण्याची योजना केली असली तरी प्रत्यक्षात महसूल विभागातील काही कर्मचारी आणि वाळू माफियांच्या संगनमतामुळे सामान्य नागरिकांना पंधरा ते सोळा हजार आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.
घरकुलासाठी मंजूर असलेल्या पाच ब्रास वाळूसाठीही काही ठिकाणी पाच ते सहा हजार रुपये घेतले जात असल्याची चर्चा आहे. तसेच वाळू वाहतुकीसाठी टिप्परला दहा ते बारा हजार रुपये मोजावे लागत असल्याने शासनाची मोफत वाळू नेमकी जाते कुठे? असा सवाल घरकुलधारकांकडून उपस्थित केला जात आहे.गेवराई तालुक्यातील सुमारे ८० टक्के घरकुलधारकांना अद्याप वाळू मिळालेली नाही. मात्र दुसरीकडे त्यांच्या नावावर हजारो ब्रास वाळूचा उपसा होत आहे. गरीबांच्या हक्काच्या वाळूवरच माफियांचा डल्ला सुरू असल्याने संताप वाढत आहे.चकलांबा परिसरात वाढती गुन्हेगारी, अवैध वाळू उपसा आणि प्रशासनाची कथित निष्क्रियता यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे चकलांबा पोलीस स्टेशनमध्ये कर्तव्यदक्ष आणि धाडसी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.आता जिल्हाधिकारी आणि एसपी साहेब या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## खासबाग हत्तीखाना आरोग्यवर्धिनी केंद्रात 'जन आरोग्य समिती'ची बैठक संपन्न






**बीड । प्रतिनिधी**
दिनांक २५ मे रोजी आरोग्यवर्धिनी केंद्र, खासबाग हत्तीखाना, बीड येथे जन आरोग्य समितीची एक अत्यंत महत्त्वाची बैठक संपन्न झाली. सदर बैठक आरोग्य सभापती निजाम यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि नगरसेवक अशफाक इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला समितीचे सह-अध्यक्ष नरेश कासट, सचिव अमोल जावळे, नगरसेवक रोहील शेख, नगरसेवक मकसुद खान, संपादक बिलाल शेख तसेच विद्या रत्नपारखी, आशा वाघमारे, बानो शेख, पद्मिनी शिंदे, पल्लवी आजबे, अंकुश समाधान, शेख समीम, महेश जायभाये, रविंद्र हातागळे, तेजल डोंगरे, सुषमा गेडाम आदी मान्यवर व समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.
या बैठकीत प्रामुख्याने खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आरोग्य सर्वेक्षणादरम्यान आणि कामाच्या वेळी नागरिकांकडून आशा ताईंना मोबाईल नंबर, वैयक्तिक ओळख क्रमांक आणि एचपीव्ही लसीकरणाबाबतची आवश्यक माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर मुद्दा बैठकीत समोर आला. यावर योग्य ती जनजागृती करण्याबाबत चर्चा झाली. खासबाग आरोग्यवर्धिनी केंद्राची वेळ बदलण्याबाबत नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने बैठकीत विचारविनिमय करण्यात आला.
आरोग्य केंद्रातील सुधारणा व औषध पुरवठा: खासबाग आरोग्य केंद्रात आवश्यकतेनुसार अंतर्गत बदल करणे तसेच सध्या भेडसावत असलेल्या औषध तुटवड्यावर मात करून रुग्णांना वेळेत औषधोपचार कसा उपलब्ध करून देता येईल, यावरही सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीच्या माध्यमातून खासबाग परिसरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी विविध उपाययोजनांवर आपले मत मांडले.

## पहिल्याच पाऊसात पाटोद्याचा न्युलुक समोर गल्लीबोळात चिखल, काही भागात कचरा तर चौकात व पुलावरील खड्ड्यात पाणीच पाणी




**पाटोदा । प्रतिनिधी**
पाटोदा शहरात झालेल्या पहिल्याच पावसाने शहरातील विविध समस्यांचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. नवीन पाईपलाईन टाकण्यासाठी अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आले होते. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर रस्ते व्यवस्थित बुजवले गेले नसल्याने शहरातील अनेक गल्लीबोळ चिखलमय झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील काही भागात कचऱ्याचे ढीग साचल्याने अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले असून पावसामुळे दुर्गंधीतही वाढ झाली आहे. राज महंमद चौक परिसरात पावसाचे पाणी साचल्याने वाहनधारक व पादचारी यांची गैरसोय होत आहे.
दरम्यान, मांजरा नदी पुलावरील खड्ड्यांमध्ये पाणीच पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. पुलावरील खड्डे पाण्याखाली गेल्याने वाहनांचा अंदाज चुकत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने रस्ते दुरुस्ती व स्वच्छतेच्या कामाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## स्वस्त धान्य दुकानदाराला भीमा टुले कडून मारहाणीसह जीवे मारण्याची धमकी

### दुकानदार विजय काळे यांची संघटनेच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारीकडे धाव

**बीड । प्रतिनिधी**
स्वस्त धान्य दुकानदार म्हटले की, त्यांना कुणीही यावे आणि टपली मारून जावे असा अनुभव कधी ना कधी येतोच येतो. असाच एक प्रकार जिल्ह्यातील नवगण राजुरी या गावात विजय काळे यांच्या स्वस्त धान्य दुकानात घडला.
याविषयी सविस्तर वृत्त असे की, बीड जिल्ह्यातील नवगण राजुरी या गावात स्वस्त धान्य दुकान असलेले राशन दुकानदार विजय काळे यांच्या दुकानावर ते दर महिन्यासारखे नियमाप्रमाणे मशीन मधून धान्य वाटप करत असताना गावातील भीमा लक्ष्मण टुले हा व्यक्ती दुकानात गेला व त्याने विजय काळे यांना जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे भीमा टुले या व्यक्तीकडे ए.पी.एल. शेतकरी या योजनेचे रेशन कार्ड असल्याने तो या योजनेचा लाभार्थी आहे. त्या योजनेत कार्डधारकाला धान्य मिळत नाही. म्हणून त्याने याचा राग काढत स्वस्त धान्य दुकानदार विजय काळे यांच्याशी भांडण करून शिवीगाळ करत



जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्या दुकानातील मशीन व इतर साहित्य दुकाना बाहेर फेकून दिले. यामुळे साहित्याची टूट-फूट होऊन आर्थिक नुकसान ही झाले. याप्रकरणी विजय काळे यांनी अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ पुणे या ऑल इंडिया फेयर प्राइस शॉप डीलर्स फेडरेशन नवी दिल्ली शी संलग्न असलेल्या आणि माजी खासदार दत्ता मेघे मुख्य सल्लागार असलेल्या संघटनेचे निरीक्षक सुमित डोंगरे, परेश मोरे, विशाल इंगोले, परशुराम जाधव, फिरोज खान, अशोक फरताळे, मनोज दांगट, दिगंबर गर्जे, बी.एस. मसवले, रमेश गंगाधरे, कान्हा आखाडे, अनंता कुटे, शहादेव तांदळे, व्ही.एस. काळे, रामचंद्र लाटे, उल्हास रकटे, रामदास गाडे यांच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन लेखी तक्रार करत भीमा लक्ष्मण टुले याच्यावर नियमानुसार कार्यवाही करावी अशी मागणी केली. कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी म्हणून ओळखले जाणारे विवेक जॉन्सन या प्रकरणात आता काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पेठ बीड पोलिसांची कारवाई, जनावरे चोरी करणारी टोळी जेरबंद

### तीन अट्टल चोर अटकेत, तीन लाखांची स्कॉर्पिओ जप्त

**बीड । प्रतिनिधी**
पेठ बीड पोलिसांनी जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तीन अट्टल चोरांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून सुमारे ३ लाख रुपये किमतीचे स्कॉर्पिओ वाहन जप्त करण्यात आले आहे. या कारवाईमुळे बीडसह इतर जिल्ह्यांमध्ये घडलेल्या जनावरे चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
दि. ०६ मे २०२६ रोजी पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागोबा गल्ली परिसरातून स्कॉर्पिओ वाहनातून गोवंश जातीची जनावरे चोरी झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्यावरून पेठ बीड पोलीस ठाण्यात गुरनं. १३०/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.
घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी तात्काळ विशेष तपास पथक नेमून आरोपींचा शोध सुरू केला. पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा व डीबी पथकाने बीड शहरातील ४० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. तपासादरम्यान काळ्या रंगाची संशयित स्कॉर्पिओ दिसून आली, मात्र वाहन क्रमांक स्पष्ट होत नव्हता.



तपास पथकाने तब्बल १९० किलोमीटरपर्यंतचे सीसीटीव्ही फुटेज आणि टोलनाक्यांची माहिती तपासली असता आरोपी वारंवार वाहनाच्या नंबर प्लेट बदलून प्रवास करत असल्याचे निष्पन्न झाले. तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे संबंधित वाहन मालेगावच्या दिशेने गेल्याचे समोर आल्यानंतर पथक तातडीने रवाना झाले. दरम्यान, संशयित आरोपी शेख इम्रान शेख ईसा (वय ३४, रा. अब्दालशा नगर, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली देत साथीदार व वाहन सिल्लोड येथे असल्याची माहिती दिली.
यानंतर पोलिसांनी सिल्लोड येथे सापळा रचून पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आणखी दोन आरोपींना शिताफीने पकडले. आरोपींकडून एमएच-४१ सी-९७१७ क्रमांकाची काळ्या रंगाची स्कॉर्पिओ जप्त करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत : इम्रान ईसा शेख (वय ३४), शेख तय्यब शेख शफीक (वय ४०, रा. मोघलपुरा, सिल्लोड) मिरची आडवी भाकर सलमान वहाब सय्यद (रा. बापूनगर, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर)
आरोपींनी बीडमधून जनावरे चोरी केल्याची कबुली दिली असून महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतही त्यांनी अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची माहिती तपासात समोर आली आहे.
पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी मिळवली असून इतर साथीदार व मुद्देमालाचा शोध सुरू आहे. पुढील तपास पोलीस हवालदार अमृत पाटोळे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा, सुभाष मोठे, नितीन राठोड, अमृत पाटोळे, विष्णू गुजर, औदुंबर गिरी व पांडुरंग परजने यांच्या पथकाने केली.

सम्पादकीय

# चला, पुन्हा जोडू या मातीशी नाते!

जागतिक वसुंधरा दिवसाच्या निमित्ताने यंदा 'आपली शक्ती, आपला ग्रह' ही संकल्पना जगभर राबवली जात आहे. केवळ मेसेज फॉरवर्ड करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून पृथ्वीला हिरवेगार कसे ठेवता येईल? देशी बियाणे, सेंद्रिय कापूस आणि प्लास्टिकमुक्तीच्या वाटेवरचे आपले पाऊल किती महत्त्वाचे आहे? कच्च्या तेलाच्या वाढत्या दरामुळे पॉलिस्टर महागले आणि कापसाची मागणी वाढली. काही वर्षांपूर्वी कापसाचे 'बीटी बियाणे' (जनुकीय सुधारित) विकसित झाले. या बियाणांमुळे उत्पादन वाढत असले तरी, कालांतराने त्याचे गंभीर दुष्परिणाम समोर येत आहेत. बीटी कापसाचा पालापाचोळा जमिनीत कुजल्यावर मातीतील सूक्ष्म जीवाणूंवर विपरीत परिणाम होतो. दरवर्षी नवीन बियाणे विकत घ्यावे लागते आणि मातीचा कस कमी झाल्याने रासायनिक खतांचा वापर अनिवार्य ठरतो, ज्यामुळे शेतीचा खर्च वाढतो. तसेच, बेकायदा 'एचटी बीटी' बियाणांमुळे 'ग्लायफोसेट'सारख्या तणनाशकांचा वापर वाढून पर्यावरणास घातक तणे तयार होतात. कापूस म्हणजे पांढरे सोने; सिंधू संस्कृतीच्या अभ्यासानुसार भारतात सुमारे ७००० वर्षांपासून कापूस पिकवला जात आहे. हे 'कापूस पुराण' मांडण्याचे कारण म्हणजे २२ एप्रिल रोजी साजरा होणारा 'वसुंधरा दिवस'. पृथ्वीच्या संरक्षणाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि जनजागृती करण्याचा हा एक महत्त्वाचा दिवस. आज आपण वापरतो ते कपडे खरोखरच पर्यावरणस्नेही आहेत का? वस्त्रोद्योगात ७०,००० हून अधिक कृत्रिम रसायने वापरली जातात, त्यापैकी केवळ २ टक्के सुरक्षित आहेत. 'पर्यावरणस्नेही कापड' म्हणजे ते उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर नैसर्गिक असावे. कॉर्पोरेट कंपन्यांनी ग्राहकांचा जो गोड गैरसमज करून दिला आहे, त्याला 'बाहेर बरवा, आत हिरवा' ही म्हण चपखल लागू पडते. या क्षेत्रात श्रीरंग देवबा लाड यांनी स्वतःचे नैसर्गिक तंत्रज्ञान विकसित केले, ज्याबद्दल त्यांना २०२६ मध्ये 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी कापसाच्या फांद्यांचा सखोल अभ्यास करून शेंडा खुडणी, अतिघन लागवड आणि ठिबक सिंचन यांसारख्या नैसर्गिक पद्धती अवलंबल्या. यामुळे बोंडाचे वजन वाढले, किडींचा प्रादुर्भाव कमी झाला आणि मातीचा ओलावा टिकून राहिल्याने शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी होऊन नफा वाढला. दुसरे उदाहरण व्ही. आर. अनंथू यांचे आहे. त्यांनी शेतकऱ्यांना जनुकीय बियाणे व रसायने सोडून शाश्वत देशी बियाणे वापरण्याचे प्रशिक्षण दिले. देशी कापसाचे 'सरळ वाण' संरक्षित करून, सेंद्रिय पद्धतीने कापूस उत्पादन ते कापड विघटनापर्यंतची सर्व प्रक्रिया नैसर्गिक ठेवली. कुशल कामगारांकडून हातमागावर विणलेल्या या कापडाला अपराजिता, हळद, मंजिष्ठा आणि पळस यांसारख्या नैसर्गिक रंगांनी सजवले जाते. अगदी बटणेही नारळाच्या करवंटीपासून बनवली जातात. हे कापड नैसर्गिक असल्याने त्याचे विघटनही सहज होते, अशा प्रकारे खऱ्या अर्थाने वसुंधरेचे देणे वसुंधरेला परत दिले जाते. वसुंधरा दिवसाची सुरुवात १९७० मध्ये अमेरिकेत झाली. युनेस्को परिषदेत शांतता कार्यकर्ते जॉन मॅक्कॉनेल यांनी मांडलेल्या प्रस्तावानंतर, सिनेट सदस्य गेलॉर्ड नेल्सन यांनी या दिवसाची अधिकृत सुरुवात केली. आज १९० हून अधिक देशांत हा दिवस साजरा होतो. सध्या आपली पृथ्वी हवामान बदल, प्रदूषण आणि जंगलतोड यांसारख्या संकटांचा सामना करत आहे. निसर्गाचे रक्षण ही केवळ सरकारची नाही, तर प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. या वर्षीच्या वसुंधरा दिनाची संकल्पना 'आपली शक्ती, आपला ग्रह' ही आहे. यात 'आपली शक्ती' म्हणजे प्रत्येक मानवाचे वैयक्तिक योगदान. आपण पुढील गोष्टी करू शकतो. १. वृक्षारोपण : केवळ झाडे लावू नका, ती जगवा. २. प्लास्टिक त्याग : एकेरी वापराच्या प्लास्टिकवर बंदी घालून कापडी पिशव्या वापरा. ३. बचत : पाणी आणि विजेचा अपव्यय टाळा. ४. कचरा व्यवस्थापन : ओला व सुका कचरा वेगळा करून 'पुनर्वापर' संस्कृती रुजवा. ५. कमी प्रदूषण : जवळच्या प्रवासासाठी सायकल वापरा किंवा चालत जा. निसर्ग आपली गरज पूर्ण करू शकतो, पण हाव नाही, हे महात्मा गांधींचे विचार आजही लागू होतात. पृथ्वी आपली माता आहे आणि वाढत्या स्वार्थामुळे आपण तिचे शोषण करत आहोत. वसुंधरा दिवस हा केवळ एक दिवसाचा सोहळा न राहता, तो आपल्या जीवनशैलीचा भाग बनायला हवा. आपली पृथ्वी हिरवीगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू या.

# ११ वी विज्ञान शाखा प्रवेश प्रक्रियेत मनमानी फी आकारणीविरोधात माजी सैनिक अशोक येडे आक्रमक

**बीड । प्रतिनिधी**

इयत्ता ११ वी विज्ञान शाखेच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२६ दरम्यान विविध विद्यालयांकडून विद्यार्थ्यांकडून शासनमान्य शुल्कापेक्षा जादा फी आकारली जात असल्याच्या तक्रारी गंभीर स्वरूपात समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व मा. जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मागील वर्षी काही विद्यालयांनी ११ वी विज्ञान शाखेच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांकडून २५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत मनमानी फी वसूल केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी असून आर्थिक शोषण होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. आम आदमी पार्टीने प्रशासनाकडे खालील माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. इन-हाऊस कोटा किती टक्के आहे व त्या प्रवेशासाठी शासनमान्य शुल्क किती आहे. सर्वसाधारण गुणवत्ता यादीसाठी किती जागा राखीव आहेत व त्यासाठी अधिकृत फी किती आहे. मॅनेजमेंट



कोटा किती टक्के आहे व त्या प्रवेशासाठी शासनमान्य शुल्क किती आहे. ही सर्व माहिती अनुदानित व विनाअनुदानित विद्यालयांसाठी स्वतंत्रपणे जाहीर करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच शासन नियमांचे उल्लंघन करून मनमानी फी आकारणाऱ्या विद्यालयांची सखोल चौकशी करून संबंधित संस्थांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. बारावी बोर्ड परीक्षेदरम्यान कॉपीमुक्तीसाठी ज्या प्रकारे भरारी पथके नेमली जातात, त्याच धर्तीवर ११ वी प्रवेश प्रक्रियेदरम्यान फी वसुलीची ऑन-द-स्पॉट तपासणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात विशेष तपासणी पथके नेमावीत, अशी मागणी आम आदमी पार्टीने केली आहे.

तसेच पालकांसाठी तक्रार निवारण हेल्पलाईन सुरू करून शासनमान्य शुल्कापेक्षा जादा फी आकारणाऱ्या संस्थांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी, अन्यथा आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी दिला आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष रफिक पठाण शहराध्यक्ष सय्यद सादेक डॉक्टर गणेश ढवळे सामाजिक कार्यकर्ते किसके ना पांचाळ सामाजिक कार्यकर्त्या कैलासचंद पालीवाल कोषाध्यक्ष आम आदमी पार्टी बाळासाहेब मोरे पाटील संस्थापक अध्यक्ष शिवशक्ती भीमशक्ती विचार मंच नितीन सोनवणे मराठवाडा प्रवक्ता ऑल इंडिया पँथर्स गणेश आजबे नितीन जायभाय डीजे तांदळे सर संजय तांदळे शेख युनूस सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर शिंदे कृष्णाजी जगताप इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिमथडी साहित्य संमेलनात संगीतकार शिवराज साने यांना प्रशिस्तपत्र देऊन सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

शनिवार दिनांक २३ मे २०२६ रोजी बोरमलनाथ मंदिर येथे



आयोजित भिमथडी साहित्य संमेलनात संगीतकार श्री शिवराज साने सर यांना प्रशिस्तपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दौंड तालुक्याचे कार्यशिल आमदार अँड राहुल दादा कुल कार्यक्रमाला उपस्थित होते. साहित्य संमेलनात संगीतकार श्री शिवराज साने आदरणीय श्री सुरज पवार यांच्या हस्ते हे प्रशिस्तपत्र देण्यात आले.

संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक श्री सुरज पवार यांची निवड करण्यात आली. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संमेलन सोहळा पार पडला. श्री शिवराज साने सर यांनी संगीत क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल व त्यांच्या कार्याचा गुणगौरव या पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात आला. संमेलनाचे आयोजन जेष्ठ साहित्यिक श्री दशरथ यादव, संदेश सोनवणे, दिपक पवार यांनी केले होते. तसेच सैराट फेम अभिनेता प्रिन्स, प्रा. फ. शिंदे, जेष्ठ कवयित्री सुवर्णा वाघमारे सुप्रसिद्ध कवी प्रा सुरेश वाळेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ स्वाती बंगळे आभार प्रदर्शन जेष्ठ कवयित्री सौ. सूवर्णा वाघमारे यांनी केले.

## पीएसीएल कंपनीतील अडकलेल्या गुंतवणूकदारांना न्याय द्या : बाजीराव ढाकणे

### राष्ट्रपती व पंतप्रधानांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील हजारो गोरगरीब, कष्टकरी, ऊसतोड मजूर, शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांचे पीएसीएल लिमिटेड कंपनीमध्ये अडकलेले कोट्यवधी रुपये तातडीने परत मिळावेत, यासाठी केंद्र शासनाने विशेष कार्यवाही करावी, अशी मागणी महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन मा. द्रोपदीजी मुर्मू राष्ट्रपती व नरेंद्रजी मोदी पंतप्रधान भारत सरकार यांना मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत सादर करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील अनेक गरीब, कष्टकरी, ऊसतोड मजूर व शेतमजूर कुटुंबांनी आपल्या आयुष्यभराच्या कष्टातून बचत केलेली रक्कम नोएडा स्थित पीएसीएल लिमिटेड कंपनीमध्ये गुंतवली होती. मात्र मागील सुमारे पंधरा वर्षांपासून या गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये कंपनीमध्ये अडकून पडले असून अद्यापही अनेकांना त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळालेले नाहीत.



या प्रकरणामुळे जिल्ह्यातील अनेक कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. मुलामुलींच्या शिक्षणाचा खर्च भागविणे कठीण झाले असून आरोग्य उपचार, विवाह, घरबांधणी तसेच शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गरीब व कष्टकरी गुंतवणूकदारांना आपल्या हक्काच्या पैशासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

श्री बाजीराव ढाकणे यांनी केंद्र शासनाने या प्रकरणात विशेष लक्ष घालून संबंधित मंत्रालय, सेबी तसेच इतर सक्षम यंत्रणांमार्फत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. तसेच लोकसभेत हा विषय उपस्थित करून बीड जिल्ह्यातील सर्व पात्र गुंतवणूकदारांना त्यांची रक्कम लवकरात लवकर परत मिळवून देण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. गरीब, कष्टकरी व ऊसतोड मजुरांच्या न्यायासाठी शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने चौंडी येथील जन्मस्थळावर लाखोच्या संख्येने उपस्थित रहा : दत्ता वाकसे

**वडवणी । प्रतिनिधी**

संबंध देशभरातील बारा ज्योतिर्लिंगाचे जीर्णोद्धार करणाऱ्या इंग्रजांना सळो की पळवून प्रस्थापित राज्य स्वतःच्या ताब्यात घेणाऱ्या इंदोरच्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१व्या जयंतीनिमित्ताने नगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या गावी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचा जन्म झाला त्यांच्या जन्म गावी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जयंती उत्सव सोहळा मोठ्या थाटामाटा मध्ये संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह राज्यातील तमाम समाज बांधवानी लाखोंच्या संख्येनी उपस्थित रहावे असे आव्हान मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकाव्दारे केले आहे.

या सोहळ्यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार याच्यासह राज्यातील विविध आमदार मंत्री उपस्थित राहणार आहेत. या जयंती उत्सव सोहळयाच्या माध्यमातून धनगर बहुजन समाजाला ऊर्जा मिळावी त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचाराची देवाण-घेवाण गावकुसातल्या गाव



गाड्यांमध्ये वाड्यावर सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचावी हा उद्देश ठेवून मनाशी ठेवून दरवर्षी हा जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला जातो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करतो पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य या पृथ्वीतलावर ना भूतो ना भविष्य असे आहे. त्यामुळे त्यांच्या विचाराचा त्यांच्या इतिहासाचा गाजावाजा व्हावा इतिहास घराघरांमध्ये पोहोचवा हा उद्देश मनाशी बाळगून या ठिकाणी हा जयंती उत्सव सोहळा दरवर्षी साजरा केला जातो. चौंडी लाखो धनगर समाज बांधव उपस्थित राहून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करतात त्यामुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील धनगर समाज बहुजन बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

पुढे बोलताना बाकसे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास खूप मोठा असून त्यांचा इतिहास आणखीही घराघरांमध्ये पोहोचलेला नाही त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थळ चौंडी येथे आपण सर्वांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहत आपल्या विचारांची देवाणघेवाण गावकसात गावगाड्यात सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी हा जन्मोत्सव सोहळा दरवर्षी साजरा केला जातो. या माध्यमातून संबंध राज्यभरातील देशभरातील धनगर समाज एक संघ व्हावा संघटनात्मक बांधणी व्हावी हा उद्देशही या जयंती उत्सवाचा मेळाव्याचा असून त्यामुळे सर्व समाज बांधवांनी या ठिकाणी मोठ्या ताकतीने उपस्थित राहत आपलं शक्ती प्रदर्शन त्याचबरोबर धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणा संदर्भामध्ये या ठिकाणी या लाखोच्या समाज बांधवांनी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या राज्याचे मुख्यमंत्री राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस याच्याकडे मांडायचे आहेत त्यामुळे आपण सर्वांनी या सोहळ्याला लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ही दत्ता वाकसे यांनी केले आहे.

## पाटोद्यात जोरदार वादळाचा तडाखा; अनेक घरांवरील पत्रे उडून नुकसान

### पंचनामे करून तात्काळ मदत जाहीर करा



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरासह परिसरात आलेल्या जोरदार वादळ व वाऱ्यामुळे अनेक घरांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक घरांवरील पत्रे उडून गेल्याने नागरिकांचे संसार उघड्यावर आले असून काही ठिकाणी झाडे व वीजतारा पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वादळामुळे विशेषतः कच्ची घरे व पत्र्याच्या शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अनेक कुटुंबांचे घरावरील पत्रे उडून गेल्याने पावसात घरात पाणी साचले असून जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, अचानक आलेल्या वाऱ्यामुळे काही मिनिटांतच घरांची पत्रे उडून गेली. गरीब व सर्वसामान्य कुटुंबांचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने पाहणी करून मदत करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान महसूल विभाग व स्थानिक प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी व शासनाकडून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## धनगरवाडीचे युवा सरपंच राजु खुंरागे यांच्या वाढदिवसानिमित्त गावात उत्साहाचे वातावरण

**आष्टी । प्रतिनिधी**

आपल्या कामाच्या धडाक्याने आणि जनसामान्यांशी असलेल्या घट्ट नात्यामुळे ओळख निर्माण केलेले धनगरवाडी गावचे युवा सरपंच तथा सुरेश आण्णा धस यांचे लोणी गण प्रमुख राजु खुंरागे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. संपूर्ण परिसरात शुभेच्छांचा वर्षाव होत असताना गावकऱ्यांमध्ये



आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. राजु खुंरागे यांनी अल्पावधीतच गावाच्या विकासासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे ग्रामस्थांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. सामाजिक, राजकीय आणि जनहिताच्या कामात कायम पुढे असणाऱ्या खुंरागे यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## आठ महिन्यांत फुलले 'ऑक्सिजन पार्क'; भर उन्हाळ्यातही हिरवागार आदर्श : दीपक देशमुख

**बारा हाजार झाडे ऐक ऐकर परीसर**

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आजच्या काळात वेगाने होणारी वृक्षतोड, वाढते प्रदूषण आणि बदलते हवामान ही गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती करणारे हात फार कमी दिसतात. परळी शहराचे माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांनी मात्र आपल्या कृतीतून एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. महाविद्यालय परिसरात अवघ्या आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेले 'ऑक्सिजन पार्क' आज भर उन्हाळ्यातही हिरवागार आणि टवटवीत दिसत आहे. या पार्कमध्ये विविध प्रकारची झाडे लावण्यात आली असून त्यांची योग्य निगा राखल्यामुळे परिसराला नैसर्गिक सौंदर्य लाभले आहे. कडक उन्हाळ्यातही या ठिकाणी गारवा आणि प्रसन्न वातावरण अनुभवायला मिळत असल्याने नागरिकांकडून या उपक्रमाचे मोठे कौतुक होत आहे.

झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरण वाचवा हा संदेश देत दीपक देशमुख यांनी समाजासमोर एक सकारात्मक उदाहरण ठेवले आहे. पर्यावरणाचा वाढता ऱ्हास थांबवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आज अनेक ठिकाणी विकासाच्या नावाखाली झाडांची मोठ्या प्रमाणात तोड होत असताना, दीपक देशमुख यांचा हा उपक्रम पर्यावरण प्रेमींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा, हिरवेगार वातावरण आणि निरोगी जीवन मिळावे यासाठी अशा प्रकारचे उपक्रम प्रत्येक गावात, प्रत्येक शहरात राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. एक झाड हजारो श्वासांचे जीवन असते हा संदेश देणारे दीपक देशमुख यांचे 'ऑक्सिजन पार्क' सध्या परळी शहरात चर्चेचा विषय बनले आहे.



## घरोघरी जनगणना कामकाजाला सुरुवात; बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची पाली येथे भेट

# अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



**बीड । प्रतिनिधी**

भारताच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणना २०२७ अंतर्गत १६ मे २०२६ पासून प्रत्यक्ष घरोघरी जाऊन जनगणना माहिती संकलनाच्या कामकाजाला सुरुवात झाली असून बीड जिल्ह्यात प्रशासनाच्या वतीने व्यापक स्तरावर जनगणना मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. जनगणना ही देशाच्या विकास आराखड्याचा पाया मानली जाते. लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार, पाणीपुरवठा, निवास, स्थलांतर, वाहतूक, डिजिटल सुविधा आणि विविध शासकीय योजनांचे नियोजन जनगणनेतील आकडेवारीवर आधारित असते. त्यामुळे प्रत्येक घरातील माहिती अचूक आणि संपूर्ण असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात जनगणना यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत असून निवासी उपजिल्हाधिकारी तथा जनगणना अधिकारी शिवकुमार स्वामी हे संपूर्ण कामकाजावर लक्ष ठेवून आहेत. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून जनगणना प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तालुका स्तरावर बीडचे तहसीलदार तथा तालुका चार्ज अधिकारी चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली जनगणना कामकाज सुरू असून अतिरिक्त चार्ज अधिकारी सुहास हजारे हे देखील कामकाजाचा आढावा घेत आहेत. महसूल सहाय्यक महादेव चौरे, विस्तार अधिकारी तुकाराम जाधव, सहाय्यक महसूल अधिकारी राहुल कसबे, ऑपरेटर गणेश सावंत, रोहित सोनवणे, महसूल सहाय्यक सरोजनी बोराडे, महसूल सेवक संभाजी शिंदे आदी अधिकारी व कर्मचारी जनगणना प्रक्रियेसाठी समन्वय आणि मार्गदर्शन करत आहेत.

दरम्यान, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी रविवारी (२४ मे) पाली येथे प्रत्यक्ष भेट देऊन जनगणना कामकाजाची पाहणी केली. श्रीकांत अश्रुबा नवले, सी.एन. - १२३, गणना घर क्रमांक ०१६५ येथे जनगणना सुरू होती. प्रगणक श्रीमती स्मिता जोशी यांनी प्रश्नावलीतील विविध प्रश्न विचारून कुटुंबाची माहिती संकलित केली. यावेळी तहसीलदार शेळके यांनी स्वतः कुटुंबीयांशी संवाद साधून माहितीची पडताळणी केली तसेच जनगणना प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले.

या पाहणीवेळी सहाय्यक महसूल अधिकारी राहुल कसबे, पर्यवेक्षक गणेश कदम तसेच प्रगणक श्री.पायके, युवराज जमदाडे, स्मिता जोशी, मीरा मोकाट, जगताप सुनीता, श्रीमती सांगळे आणि श्रीमती वैद्य उपस्थित होते. प्रशासनाच्या माहितीनुसार, दि.१६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक प्रत्येक घरात जाऊन माहिती संकलित करणार आहेत. घराची रचना, कुटुंबातील सदस्यांची संख्या, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर, इंटरनेट वापर, वाहनांची संख्या, पाणीपुरवठा, स्वच्छता सुविधा, घरातील उपलब्ध साधने, इंधन वापर, सामाजिक आणि आर्थिक स्थिती यासंदर्भात विविध प्रश्न विचारले जाणार आहेत.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा जनगणना अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून शासनाच्या भावी धोरणांची दिशा ठरविणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांना प्रगणकांना योग्य आणि सत्य माहिती देण्याचे आवाहन केले असून चुकीची अथवा अपूर्ण माहिती देणे टाळावे, असे स्पष्ट केले आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की, जनगणना प्रक्रिया पूर्णपणे गोपनीय असून नागरिकांनी कोणतीही भीती किंवा संभ्रम न बाळगता प्रशासनाला सहकार्य करावे. शासनाच्या विविध योजनांचे भविष्यातील नियोजन जनगणनेतील माहितीवर आधारित असते. त्यामुळे प्रत्येक माहिती अचूक असणे आवश्यक आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अधिकृत ओळखपत्र असलेल्या प्रगणकांनाच माहिती द्यावी, कोणालाही ओ.टी.पी. अथवा बँकिंग माहिती देऊ नये तसेच कोणतीही शंका असल्यास तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

---

## मुख्याधिकारी साहेब रस्त्यावरील गरीब विक्रेत्यांवर कारवाई; मात्र रस्त्यावर पडलेले खड्ड्यांकडे दुर्लक्ष?

### बीड नगर परिषद प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये संताप

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये रस्त्याच्या कडेला हातावर पोट भरणाऱ्या गरीब भाजी, फळ व लहान व्यावसायिकांवर अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाई केली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



शहरातील मुख्य रस्ते, चौक आणि गल्लीबोळांमध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, त्यामुळे वाहनचालक व नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. मात्र या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करून नगर परिषद प्रशासन गरीबांच्या व्यवसायांवर कारवाई करण्यात व्यस्त असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. पावसाळ्यापूर्वीच रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असून, अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. तरीदेखील नगर परिषदेकडून तातडीने दुरुस्ती केली जात नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.

दुसरीकडे, रोजंदारीवर जगणारे छोटे विक्रेते व हातगाडीधारक यांच्यावर अतिक्रमण हटाव मोहिमेद्वारे कारवाई करण्यात येत असल्याचे चित्र आहे. रस्त्यावर व्यवसाय करणारे गरीबच प्रशासनाला दिसतात; पण शहरभर पडलेले खड्डे दिसत नाहीत का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

काही सामाजिक कार्यकर्त्यांनीही या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, शहरातील मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून गरीबांवर कारवाई करणे अन्यायकारक असल्याचे मत व्यक्त केले आहे. आधी रस्ते दुरुस्त करून नागरिकांना सुरक्षित सुविधा द्याव्यात आणि त्यानंतर अतिक्रमणाच्या प्रश्नावर नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पुढे येत आहे.

---

## कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांच्या घराला शस्त्रधारी पोलीस बंदोबस्त

### डॉ. जितीन वंजारे यांनी केली होती सुरक्षा देण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

अवघ्या सहा दिवसांत सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय ठरत देशातील चर्चेचा विषय बनलेल्या कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांना मिळालेल्या धमक्यांची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. बीड येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. जितीन वंजारे यांनी अभिजीत दिपके तसेच त्यांच्या कुटुंबीयांना तात्काळ सुरक्षा प्रदान करण्यात यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली होती. या मागणीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथील दिपके यांच्या निवासस्थानी शस्त्रधारी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



देशातील वाढती बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक प्रश्नांवर व्यंगात्मक पद्धतीने आवाज उठवणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीला युवकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, सोशल मीडियावर या पक्षाची लोकप्रियता झपाट्याने वाढत आहे. दरम्यान, अभिजीत दिपके यांना मिळालेल्या धमक्यांमुळे समर्थकांमध्ये चिंता व्यक्त होत होती. प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत असून, डॉ. जितीन वंजारे यांनीही पोलिस प्रशासनाचे आभार मानले आहेत.

---

## मलकापूरच्या पोलिस पाटलांवर प्रशासनाची दिशाभूल केल्याचा ठपका

### उपविभागीय अधिकाऱ्यांकडून खुलासा सादर करण्याचे आदेश; गावात गोंधळ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करून सेवेतून बडतर्फ करावे : भागवत गित्ते

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे मलकापूर येथील पांदण रस्त्याच्या वादातून आता प्रशासन विरुद्ध पोलिस पाटील असा नवा वाद निर्माण झाला असून, तहसील प्रशासनाची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप संबंधित पोलिस पाटील यांच्यावर करण्यात आला आहे. याबाबत गावातील भगवत रामकिशन गित्ते यांनी उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती.



निवेदना म्हटले होते की,मलकापूर येथील पांदण रस्त्याच्या पाहणीसाठी तहसील प्रशासनाचे पथक गावात आले असताना संबंधित पोलिस पाटील यांनी प्रशासनाला चुकीची माहिती देऊन संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ही जागा नसून दुसरीकडे आहे असे सांगत मोबाईलमधील चुकीचे ठिकाण दाखवून अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यात आल्याची तक्रारी अर्जात करण्यात आला आहे. तसेच गावातील एका गटाची बाजू घेत शेतकरी बांधवांमध्ये वाद निर्माण होईल, असे वातावरण तयार केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मात्र तहसील प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी अधिकृत नकाशे व कागदपत्रांच्या आधारे प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून वस्तुस्थिती तपासली असल्याचे अर्जदारांनी म्हटले आहे. पोलिस पाटील हे गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियुक्त असताना त्यांनी पक्षपाती भूमिका घेत प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला असून, यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या तक्रारीची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ यांनी संबंधित पोलिस पाटील मलकापूर यांना नोटीस बजावली आहे. दि. २५ मे २०२६ रोजी सकाळी १२ वाजता कार्यालयात उपस्थित राहून या प्रकरणी आपले म्हणणे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या कामात कोणताही विलंब करू नये, असेही नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. यावर कारवाई करून सेवेतून कमी करावे अशी मागणी तक्रारदार यांनी केली आहे. याप्रकरणी कारवाई विलंब झाल्यास जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांची भेट घेणार असल्याचेहि भागवत गित्ते यांनी सांगितले.

---

## भटक्या कुत्र्यांच्या गळ्यात जमिनीपर्यंत लोंबकळणारे बांबूचे दांडूके बांधा

### एस.एम.युसूफ़, रमेश गंगाधरे यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून त्यांच्या गळ्यात जमिनीपर्यंत लोंबकळणारे बांबूचे दांडूके बांधा अशी मागणी करणारे निवेदन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी बीड नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्यासह जिल्हाधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.




याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहरामध्ये संपूर्ण शहरभरात मोठ्या संख्येने भटक्या कुत्र्यांचा उपद्व्याप वाढला आहे. त्यांच्या प्रचंड संख्येत असलेल्या टोळक्यांनी आतापर्यंत आबालवृद्धांसह अनेक नागरिकांवर हल्ले करून जबर जखमी केले आहे. संपूर्ण बीड शहरात मुख्य रस्ते असो की, उप रस्ते की, गल्लीबोळ कुठेही भटक्या कुत्र्यांचा मुक्त संचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे कोणत्याही रस्त्यावरून ये-जा करताना नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन वावरावे लागत आहे. आतापर्यंत भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर अंकुश लावण्यास बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासन सपशेल अपयशी ठरले आहेत. प्रथम जाहीर केलेले भटक्या कुत्र्यांना पकडून शहराबाहेर दूर नेऊन सोडण्याचे कार्य काही झाले नाही. त्यानंतर भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे नसबंदी अर्थातच निर्बिजीकरण करण्याची प्रक्रिया सुद्धा करण्यात आली नाही.

म्हणून आता संपूर्ण बीड शहरासह बीड जिल्ह्यातील एकूण एक भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांच्या गळ्यात जमिनीपर्यंत लोंबकळणारे बांबूचे दांडूके बांधण्यात यावेत. जेणेकरून भटके कुत्रे धावून नागरिकांच्या अंगावर जाणार नाहीत. धावायचे असल्यास गळ्यात बांधलेले दांडूके तोंडात धरून पळावे लागते. पर्यायाने ते नागरिकांना चावून जखमी करू शकणार नाहीत. म्हणून आता बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यामधील भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून गळ्यात जमिनीपर्यंत लोंबकळणारे बांबूचे दांडूके बांधण्याची मोहीम हाती घ्यावी. अशी मागणी करणारे निवेदन एस.एम.युसूफ़ आणि रमेशराव गंगाधरे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहे.

---

## बीड नव्हे बिहारच! घरात घुसून महिलेवर अत्याचार, माजी सभापतीच्या पोराचं कृत्य, शहरात खळबळ

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये गुन्हेगारी घटना काही केल्या कमी होत नाही, त्यामुळे कायद्याचा धाक कुणाला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थितीत केला जात आहे, अशातच आता बीडमधून एक संतापजनक घटना समोर आली आहे. घरात एकटी असल्याचं पाहून एका नराधमाने घरात घुसून तिच्यावर अत्याचार केला. आरोपी हा वाल्मिक कराडच्या गँगशी संबंधित असल्याचं सांगितलं जात आहे. आरोपी फरार असून शोध घेतला जात आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरात ही घटना उजेडात आली आहे. पीडित ३१ वर्षीय महिला ही घरी एकटीच होती. हे पाहून आरोपी अमर बांगर याने तिच्या घरात प्रवेश केला आणि तिच्यावर अत्याचार करून पळून गेला. २३ एप्रिल २०२५ रोजी बीड इथं आणि १५ सप्टेंबर २०२५ रोजी नंदुरबार इथं या महिलेवर अत्याचार करण्यात आले होते. पीडित महिलेनं धाडस दाखवत पोलीस ठाण्यात धाव घेतली. शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पीडितेच्या तक्रारी आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी अमर बांगरचा सगळीकडे शोध सुरू केला. पण, आरोपी हा फरार झाला. पोलिसांनी अमरचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथक तयार केली असून शोध घेत आहे.

धक्कादायक म्हणजे, आरोपी अमर बांगर याचे वडील किरण बांगर हे राजकीय पक्षाशी संबंधित आहे. तसंच आरोपी अमर बांगरचं नाव याआधीही शहरातील काही गुन्हेगारी टोळीशी संबंधित असलेल्या व्यक्तींशी जोडलेली असल्याचं समोर आलं होतं.

आरोपी अमर बांगर सध्या फरार झाला आहे. पण, अजूनही पोलिसांना अमरला पकडण्यात अपयश आलं आहे. पोलिसांनी तपासाची चक्र फिरवली आहे. पण, अद्याप तो काही सापडला नाही. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहे. पण, या प्रकरणामुळे बीडमध्ये कायद्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थितीत झाले आहे.

---

## पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील २१ गावांमध्ये जलसंधारण कामांना गती

### वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट व डि-मार्ट फाऊंडेशनचा संयुक्त पुढाकार



**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील २१ गावांमध्ये जलसंधारण व पाणी संवर्धनाची विविध कामे हाती घेण्यात येणार आहेत. ही कामे Watershed Organisation Trust (WOTR) यांच्या माध्यमातून तसेच D-Mart Foundation यांच्या आर्थिक सहकार्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली. या प्रकल्पाच्या अनुषंगाने दि. २० मे २०२६ रोजी खडकवाडी येथे सहभागी गावांतील सरपंच, उपसरपंच व प्रतिष्ठित नागरिकांची कार्यशाळा उत्साहात पार पडली. बैठकीस थजढठ अहिल्यानगर कार्यालयाचे स्टेट मॅनेजर गणेश राजापुरे तसेच श्री. लोमेश जोरी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत जलसंधारण, मृदासंधारण, महिला सक्षमीकरण तसेच जलव्यवस्थापनाबाबत जनजागृतीची विविध कामे करण्यात येणार आहेत. या कामांमुळे पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार असून शेती उत्पादनात वाढ, भूजल पातळीत सुधारणा आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यास मोठा हातभार लागणार आहे. स्थानिक ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग घेऊन गावनिहाय नियोजन करण्यात येणार असून जलसंधारणाच्या माध्यमातून शाश्वत ग्रामीण विकास साधण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. या प्रकल्पामुळे अनेक शेतकरी कुटुंबांना दीर्घकालीन लाभ मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

---

## पावसाळी अधिवेशनावेळी आजाद मैदान मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाला आ.विजय राजे पंडित यांचा जाहिर पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक संरक्षण कायदा बनवण्यासाठी पावसाळी अधिवेशनावेळी आजाद मैदान मुंबई येथे होणा-या आंदोलनाला गेवराईचे लोकप्रिय आमदार व बीड मतदार संघाचे मार्गदर्शक मा.आ. विजय राजे पंडित साहेबांनी पाठिंबा जाहिर करुन अधिवेशनामध्ये या विषयाला लक्षवेधी घेवू व आजाद मैदान मुंबई येथे भेटही देवू असे आश्वासन दिले.



राज्यात अल्पसंख्याक समाजावर होणा-या अन्याय अत्याचाराविरोधात जसे मॉबलिंचिंग, जातीय दंगली, हेटस्पिच (बेताल वक्तव्य) सोशलमीडिया वर जातीयवाचक मजकुर टाकुन दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणे याला आळा घालण्यासाठी व राज्यातील अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम बौद्ध क्रिश्चियन जैन पारसी सिख घटकांचे संरक्षण व्हावे या करिता अल्पसंख्याक संरक्षण संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने अल्पसंख्याक संरक्षण कायदा बनवण्यासाठी महाराष्ट्र विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनावेळी आजाद मैदान मुंबई येथे आंदोलन होणार आहे. या आंदोलनाला पाठिंबा जाहिर केल्याबद्दल आमदार साहेबांचे अल्पसंख्याक संरक्षण संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले सोबत बीड नगराध्यक्ष प्रतिनिधि शेख मुजीब साहेब व नगरपालिका सभापती शेख निजाम सरकार होते.

---

## शाहंशाह वली दर्गा परिसरातील रेशमवाला कब्रस्तानसमोरील अतिक्रमण तात्काळ हटवा : रमीज शेख

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील भालदारपुरा भागातील ऐतिहासिक शाहंशाह वली दर्गा परिसरातील रेशमवाला कब्रस्तानसमोर पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण वाढल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. हे वाढलेले बेकायदेशीर अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष शेख रमीज अहमद यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना एक सविस्तर निवेदन दिले आहे.



मुख्याधिकार्यांना दिलेल्या निवेदनात शेख रमीज अहमद यांनी नमूद केले आहे की, शाहंशाह वली दर्गा आणि रेशमवाला कब्रस्तान परिसराच्या आजूबाजूला काही स्थानिक लोकांनी जाणीवपूर्वक अतिक्रमण केले आहे. यापूर्वी नगरपरिषद प्रशासनाने धडक कारवाई करत येथील सर्व अतिक्रमण निष्कासित केले होते. मात्र, प्रशासनाचा वचक न राहिल्यामुळे की काय, काही घटकांनी पुन्हा एकदा या ठिकाणी नव्याने पक्के व कच्चे अतिक्रमण उभारले असल्याचा थेट आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या अतिक्रमणामुळे केवळ रस्ता अरुंद झाला नसून, या भागात गंभीर सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

निवेदनात दिलेल्या माहितीनुसार संबंधित अतिक्रमण केलेल्या ठिकाणी काही समाजकंटकांकडून बेकायदेशीर व्यवसाय चालवले जात आहेत. या परिसरात गांजा व इतर अंमली (नशा आणणाऱ्या) औषधांची सर्रास विक्री आणि सेवन होत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. रात्रीच्या वेळी व दिवसाही नशेबाजांचा वावर वाढल्याने परिसरातील शांतता भंग पावत आहे. दर्गा आणि कब्रस्तान परिसर हा अत्यंत पवित्र आणि संवेदनशील मानला जातो. मात्र, वाढत्या अतिक्रमणामुळे आणि तिथे चालणाऱ्या गैरप्रकारांमुळे स्थानिक नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कोणत्याही क्षणी एखादी अनुचित घटना घडू शकते, अशी भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीची तात्काळ दखल घ्यावी. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.- शेख रमीज अहमद (जिल्हा कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग, बीड)

# बीड कामगार कार्यालयात कोट्यवधींचा डल्ला

# भ्रष्ट अधिकाऱ्यांची थेट मंत्र्यांच्या नावाने मस्ती!

## गोरगरिबांच्या हक्काच्या कोटींच्या निधीवर दरोडा; भ्रष्ट अधिकाऱ्यांना वरिष्ठ मंत्र्यांचेच अभय?

**बातम्या कचऱ्याच्या डब्यात, तक्रारींची थप्पी; बीडमध्ये लोकशाहीचा गळा घोटणारा भ्रष्टाचार!**

**मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून 'या' बड्या माशांच्या मुसक्या आवळण्याची जनतेची थेट मागणी!**

**हक्काच्या किटसाठी २५०० रुपयांची मागणी; दाम्पत्याला गचांडी देऊन धमकी; कामगारांना धक्काबुक्की करणाऱ्या वसुली बहादुरांवर गुन्हा दाखल!**





माजलगाव । विश्वनायक न्यूज

महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून राज्यातील गोरगरीब, कष्टकरी कामगारांच्या कल्याणासाठी राज्य सरकारकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जातो. परंतु, बीड जिल्ह्यात मात्र हा निधी गरजू कामगारांपर्यंत पोहोचण्याऐवजी अधिकारी आणि मंत्र्यांच्याच खिशात जात असल्याचा खळबळजनक आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे. कामगार मंत्री, मंडळ सचिव, उपआयुक्त, सरकारी कामगार अधिकारी आणि दुकान निरीक्षक यांनी संगनमत करून केवळ कागदी घोडे नाचवत हा निधी हडप केला असल्याचे आरोप बीड जिल्ह्यातील कामगारांनी केला आहे! सध्या या महाभ्रष्टाचाराचीच चर्चा चौकाचौकात रंगत आहे.







महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून गोरगरीब कामगारांसाठी येणारा कोट्यवधी रुपयांचा निधी थेट कामगारांपर्यंत पोहोचतो की अधिकाऱ्यांच्या खिशात जातो? असा संतप्त सवाल आता बीड जिल्ह्यातील जनता विचारू लागली आहे. २३ मे रोजी माजलगाव शहरातील जगदंब सेवा केंद्रावर घडलेल्या अत्यंत गंभीर आणि संतापजनक प्रकारामुळे बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले असून, या प्रकरणाचे धागेदोरे थेट मंत्रालयापर्यंत पोहोचल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव शहरातील 'जगदंब सेतू सुविधा केंद्रावर' उषा शिंदे या त्यांचे पती संतोष शिंदे यांच्यासोबत शासनाकडून मिळणारी आपली हक्काची कामगार किट घेण्यासाठी गेल्या होत्या. तिथे कामकाज पाहणारे सुरज सरवदे आणि विलास उगले यांना शिंदे यांनी किटबाबत विचारणा केली असता, त्यांनी किट आल्याचे मान्य केले. मात्र, ही शासकीय किट देण्यासाठी त्यांनी २५०० रुपयांची थेट लाच मागितली! गोरगरीब शिंदे दाम्पत्याने पैसे देण्यास असमर्थता दर्शवली, तेव्हा पैसे दिले नाही तर किट मिळणार नाही अशी अरेरावी या वसुली बहादरांनी केली. अखेर संतोष शिंदे यांनी माझ्याकडे २००० रुपये आहेत, ते घ्या आणि माझ्या पत्नीची किट द्या अशी विनंती केली. परंतु, पैशांची हाव सुटलेल्या त्या दोघांनी संतोष शिंदे यांना थेट गचांडी देऊन, अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली! या गंभीर प्रकारानंतर पीडित संतोष शिंदे यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेमुळे बीड जिल्ह्यात शासकीय नियम आणि कायदा सुव्यवस्था शिल्लक राहिली आहे की नाही? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. हा प्रकार केवळ एका केंद्रापुरता मर्यादित नसून यामागे खूप मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा आरोप होत आहे. राज्य सरकारकडून कामगार मंडळाला कोट्यवधींचा निधी दिला जातो. परंतु, कामगार मंत्री, मंडळ सचिव विवेक कुंभार, उपआयुक्त नितीन पाटणकर, सरकारी कामगार अधिकारी आणि दुकान निरीक्षक हे सगळे संगनमत करून या निधीवर डल्ला मारत असल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. नागरिकांनी पुराव्यानिशी शेकडो तक्रारी करूनही आत्तापर्यंत एकाही भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. उलट, वृत्तपत्रांमध्ये शेकडो बातम्या प्रसिद्ध होऊनही वरिष्ठांनी याकडे डोळेझाक केली आहे, हा लोकशाहीचा गळा घोटण्याचाच प्रकार आहे.

### आमदार सुरेश धस यांनी अधिवेशनात विषय मांडूनही 'काशीद' मोकाटच!



दुकान निरीक्षक अजय काशीद: यांच्या विरुद्ध धाराशीवपासून ते बीडपर्यंत भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी प्रलंबित आहेत. आष्टी मतदारसंघाचे दबंग आमदार सुरेश धस यांनी विधिमंडळ अधिवेशनात पुराव्यानिशी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर कामगार मंत्र्यांनी पथक नेमून चौकशीचे आश्वासन दिले. पथकाने चौकशी करून भ्रष्टाचार निष्पन्नही केला, मात्र तरीही अजय काशीद अद्याप मोकाटच आहे! त्यांना कोणाचे अभय आहे? दुकान निरीक्षक महेंद्र अंकुश: यांच्यावरही बोगस कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांची अफरातफर केल्याचे गंभीर आरोप आहेत. मात्र, त्यांच्यावरही वरिष्ठ पातळीवरून अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

### आमची वरपर्यंत पोहोच, कारवाई कशी होते तेच बघू! भ्रष्ट अधिकाऱ्यांची मस्ती!

बीड जिल्ह्यातील चौकाचौकात सध्या एकाच गोष्टीची चर्चा सुरू आहे की, कामगार मंत्री आकाश फुंडकर, मंडळ सचिव विवेक कुंभार, उपआयुक्त नितीन पाटणकर आणि स्थानिक सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे अनेक तक्रारी जाऊनही ते ढिम्म हलत नाहीत. यामुळे बीडमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांची मस्ती कमालीची वाढली आहे. आमची वरपर्यंत पोहोच आहे, आमच्या विरोधात कितीही तक्रारी केल्या तरी आमचे कोणी काहीही वाकडे करू शकत नाही. आम्ही सर्व मिळून वरपर्यंत पैसा पोहोचवतो. जर आमच्यावर कारवाई केली, तर आम्ही वरिष्ठांची नावे सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेसमोर उघडी पाडू! अशी उघड धमकीच हे अधिकारी खाजगीत देत असल्याची चर्चा आता वाऱ्यासारखी पसरली आहे.

### पुराव्यांसह शेकडो तक्रारी, पण कारवाई शून्य!

कष्टकऱ्यांच्या रक्ताचा पैसा लाटणाऱ्या या भ्रष्ट यंत्रणेविरोधात बीड जिल्ह्यातील जागरूक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक तक्रारी थेट पुराव्यानिशी वरिष्ठ पातळीवर केल्या आहेत. मात्र, तरीही आत्तापर्यंत एकाही भ्रष्ट अधिकाऱ्यावर साधी कारवाई करण्याचे सौजन्य वरिष्ठ पातळीवरून दाखवले गेलेले नाही. यामुळेच कामगार मंत्री, मंडळ सचिव, उपआयुक्त आणि सरकारी कामगार अधिकारी हे स्वतःच या भ्रष्टाचाराला जाहीर पाठबळ देत असल्याचा थेट आरोप आता जनतेतून केला जात आहे.

### चौथ्या स्तंभाची अवहेलना; लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रकार!

बीड येथील कामगार कार्यालयात चाललेल्या या काळ्या कारभाराचे वाभाडे जिल्ह्यातील विविध वृत्तपत्रांनी शेकडो बातम्यांच्या माध्यमातून काढले. लोकशाहीचा चौथा स्तंभ ओरडून ओरडून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करत असतानाही, वरिष्ठांनी या बातम्यांची साधी दखलही घेतली नाही. हा थेट लोकशाहीचा गळा घोटण्याचा आणि जनतेच्या आवाजाचा गळा आवळण्याचा प्रकार असल्याची संतप्त भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, आता तुम्हीच न्याय करा!

गोरगरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जाणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या स्वच्छ प्रतिमेला डाग लावण्याचे काम हे भ्रष्ट अधिकारी आणि त्यांचे पाठीराखे करत आहेत. त्यामुळे आता या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी स्वतः गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. बीड कामगार कार्यालयातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी तातडीने उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात यावी. मंत्र्यांचे नाव सांगून कोट्यवधी रुपयांचा निधी लाटणाऱ्या या बड्या माशांच्या तात्काळ मुसक्या आवळण्यात याव्यात. गोरगरीब बांधकाम कामगारांना त्यांचा हक्काचा निधी तात्काळ मिळवून द्यावा. कष्टकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या या टोळीचा पर्दाफाश मुख्यमंत्री कधी करणार आणि या 'कागदी घोडे' नाचवणाऱ्या भ्रष्टाचाऱ्या तुरुंगाची हवा कधी दाखवणार, याकडे आता संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---


## आता मात्र डोकं गरगरू लागलंय; वृत्तपत्र धुरिनांनो वेळीच पाऊल उचला

### अन्यथा ए.आय. प्रसिद्धी माध्यमांवरचा विश्वास डळमळीत केल्याशिवाय राहणार नाही

बीड । प्रतिनिधी

अलीकडील काही दिवसात ए.आय. च्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या पोस्ट सोशल मीडियावर पाहून डोकं गरगरू लागले आहे. यामुळे लोकशाहीच्या या चौथ्या आधारस्तंभावरून वाचकांचा विश्वास डळमळीत झाल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा वृत्तपत्र धुरीनांनी या विरोधात वेळीच पाऊले उचलणे आवश्यक आहे. असे मत मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

अलीकडे ए.आय. च्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या पोस्ट सोशल मीडिया वरून मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. यात पूर्वी रस्त्यावर सायकल चालविणाऱ्यांना टॅक्स भरावे लागायचे. पायी चालणाऱ्यांना सुद्धा टॅक्स भरावे









लागायचे अशी पोस्ट व्हायरल झाली. त्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच वेळी ३५ पुरणपोळ्या आणि ०१ किलो शुद्ध तूप खाल्ल्याची बातमी नामवंत दैनिक तरुण भारत मध्ये छापून आल्याची जुनी दिसणारी कटिंग सुद्धा व्हायरल झाली, आणि आता नुकतीच लग्न झालेल्या पुरुषाने रखेली ठेवण्यासाठी अधिकृतरित्या काढलेला परवाना सुद्धा मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. सोशल मीडिया वरून अशा प्रकारे जुने दिसणाऱ्या संदेशांचे पोस्टर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अशा संदेशांना काहीजण खरे समजून व्हायरल करीत आहेत तर काहीजण टिंगल-टवाळी करून मजा घेण्यासाठी व्हायरल करीत आहेत. जुने दिसणारे जे परवाने सोशल मीडियावरून फिरविले जात आहेत, त्याची सत्य-असत्यता पडताळून पाहण्याचा मार्ग आहे की नाही हेही सोशल मीडियाचा उपयोग करणाऱ्यांना माहित नाही. असे परवाने व्हायरल झाले तरी समाज माध्यमात काही फरक पडणार नाही. परंतु तरुण भारत सारख्या नामवंत वृत्तपत्राच्या नावासहित विद्यमान मुख्यमंत्री एका वेळेस ३५ पुरणपोळ्या आणि ०१ किलो तूप खातात ही बातमी जेव्हा व्हायरल होते, तेव्हा लोकशाहीच्या या चौथ्या आधारस्तंभावर खरंच विश्वास करावा की नाही अशी अवस्था वाचकांची होते. यापुढेही जर अशा प्रकारे कोणत्याही दैनिकाच्या नावासहित जुनी तारीख टाकून, ए.आय. तंत्रज्ञान वापरून, व्हायरल करण्यात आली आणि त्यात सत्यता नसेल अशावेळी लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभावरील वाचकांचा विश्वास डळमळीत झाल्याशिवाय राहणार नाही. शिवाय प्रसिद्धी माध्यमावर गालबोट लागेल. तेव्हा वृत्तपत्र धुरीनांनी अशा उचापत्या किंवा उपद्व्यापाकडे लक्ष देऊन वेळीच पाऊले उचलणे आवश्यक आहे. असे मत मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मांडले आहे.

---

## संतोष शिंदे विरुद्ध पुन्हा गुन्हा दाखल दोन दिवसांत दुसरी कारवाई

**समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्टचे प्रकरण**

नेकनूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथे सोशल मीडियावर कथित आक्षेपार्ह व समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्टप्रकरणी संतोष बजरंग शिंदे याच्याविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांत त्याच्याविरोधात दाखल झालेला हा दुसरा गुन्हा असल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

**धार्मिक भावना दुखावल्याने दुसरा गुन्हा दाखल**

दरम्यान, संतोष शिंदे हा फेसबुक व इतर सोशल मीडिया माध्यमांवरून वारंवार धार्मिक भावना दुखावतील तसेच दोन समाजांमध्ये वैमनस्य निर्माण होईल अशा स्वरूपाच्या पोस्ट करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हिंदू जनआक्रोश मोर्चानंतर मुस्लिम समाजाबाबत करण्यात आलेल्या एका वादग्रस्त पोस्टमुळे संबंधित समाजाच्या भावना दुखावल्याची तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी सय्यद जबी यांच्या फिर्यादीवरून दिनांक २३ मे २०२६ रोजी दुपारी नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. संबंधित व्यक्तीकडून फेसबुक व सोशल मीडियावर वारंवार आक्षेपार्ह पोस्ट केल्या जात असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही बीड बायपास रोडवरील आहेर वडगाव चौक परिसरातील प्रसिद्ध दुबई पॅलेस हॉटेलची सोशल मीडियावरून कथित बदनामी केल्याप्रकरणी संतोष शिंदे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यामुळे सलग दोन दिवसांत दोन गुन्हे दाखल झाल्याने या प्रकरणाची मोठी चर्चा सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नेकनूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आहेर हे करीत आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि अशा विकृत वृत्तींचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी नेकनूर परिसरातील सुजाण नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**'दोस्त बना आस्तीन का साप' : मैत्रीत पडली मिठाची गुळणी**

या संपूर्ण प्रकरणाला आता दोस्त बना आस्तीन का साप अशी चर्चा रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष बजरंग शिंदे आणि अर्शमिद कधीकाळी अत्यंत जवळचे मित्र होते. दोघांनी मिळून नेकनूर शहराच्या विविध प्रश्नांसाठी आणि विकासासाठी एकत्र येत सामाजिक आंदोलनेही केली होती. मात्र, संतोष शिंदे याला सध्याच्या काही समाजात तेढ निर्माण करणाऱ्या राजकीय नेत्यांची संगत लागली आणि त्याला धार्मिकवादाची लागण झाली. राजकीय स्वार्थ आणि धार्मिक द्वेषापोटी त्याने स्वतःच्याच मित्राला टार्गेट करण्यास सुरुवात केली. केवळ द्वेषभावनेतून त्याने आपल्याच मित्राच्या 'हॉटेल दुबई पॅलेस'ची सोशल मीडियावरून जाणूनबुजून बदनामी करण्यास सुरुवात केली. हा प्रकार समोर आल्यानंतर, राजकीय नेत्यांच्या नादाला लागून स्वतःच्याच मित्राच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या या प्रवृत्तीबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. ही घटना आजच्या सर्वच मित्रांसाठी एक मोठा धडा आहे की, समाजात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या राजकीय नेत्यांना डोक्यावर घेऊ नका, अन्यथा कितीही घट्ट असलेली मैत्री सुद्धा कधी शत्रुत्वात बदलेल हे सांगता येत नाही.

---

## कृषी विभाग च्या फळरोपवाटिकेत उत्तम प्रतीचे कलमे, रोपे विक्रीसाठी उपलब्ध : प्रियांका झणझणे

माजलगाव । प्रतिनिधी



येथील शासकीय फळरोप वाटीकेत उत्तम प्रतीची आणि खात्रीशीर सर्व फळझाडांची कलमे आणि रोपे विक्री साठी उपलब्ध असून ज्या शेतकर्याना पाहिजे आहेत त्यांनी दिलेल्या वेळेत संपर्क साधावा असे आव्हान येथील कृषी अधिकारी प्रियांका झनझणे यांनी केले आहे.

खालील प्रकार ची उपलब्ध कलमे रोपे आहेत. केशर आंबा, सरदार एल ४९ पेरू, कागदी लिंबू, कालीपत्ती चिक्कु, स्थानिक सीताफळ, स्थानिक जांभूळ, स्थानिक चिंच आदींची रोपे कलमे मिळतील या रोपांची खास वैशिष्ट्ये : शासकीय मान्यताप्राप्त दर्जेदार रोपे, रोगमुक्त व निरोगी, स्थानिक हवामानाला अनुरूप, शासनमान्य परवडणारे दर, उच्च उत्पादनक्षम आणि टिकाऊ लागवडीसाठी उपयुक्त सदरील रोपे मिळण्याचे ठिकाण परभणी चौक, तेलगाव रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड- ४३११३१ आणि मोबाईल नंबर पुढील प्रमाणे आहे ९४०३२४६३९०, ९७६५३८०१९८ या मोबाईल वर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संपर्क करावा असे आव्हान येथील कृषी अधिकारी प्रियांका झनझणे यांनी केले आहे.

---

## सामाजिक अंकेक्षणासाठी निवड झालेल्या साधन व्यक्तींना नियमित काम देण्याच्या मागणीचे मंत्री भरत गोगावले यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय मुंबई अंतर्गत निवड झालेल्या साधन व्यक्तींना नियमित स्वरूपाचे काम उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी बीड जिल्ह्यातील साधन व्यक्तींनी रोजगार हमी योजना मंत्री नामदार भरत शेट गोगावले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, गणेश काळे, बाजीराव ढाकणे, रज्जाक शेख शरद बारहाते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या पदभरती जाहिरातीनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेसाठी बीड जिल्ह्यातून १०० साधन व्यक्तींची निवड



करण्यात आली होती. तर राज्यभरात ३४०० साधन व्यक्तींची निवड सन २०२३ मध्ये झाली आहे. मात्र निवडी होऊनही अडीच ते तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. तरीही या साधन व्यक्तींना तीन वर्षांत केवळ सात महिन्यांचेच काम देण्यात आले असून उर्वरित काळात बेरोजगारीची वेळ त्यांच्यावर आली आहे.

यावेळी बोलताना बाजीराव ढाकणे यांनी सांगितले की, सामाजिक अंकेक्षण ही शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांच्या पारदर्शकतेसाठी महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे ही प्रक्रिया सातत्याने राबवून निवड झालेल्या साधन व्यक्तींना नियमित काम उपलब्ध करून द्यावे. तसेच शासनाच्या विविध विभागांतील योजनांचे मूल्यांकन आणि सामाजिक अंकेक्षणाची जबाबदारीही या साधन व्यक्तींमार्फतच होणं गरजेचं आहे, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी मंत्रालय, मुंबई अंतर्गत निवड झालेल्या साधन व्यक्तींमार्फत प्रत्येक जिल्ह्यात विविध लोककल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण प्रभावीपणे राबविणे शक्य आहे. त्यामुळे शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन साधन व्यक्तींना बेरोजगार होऊ देऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर श्री बाजीराव ढाकणे, गणेश काळे, रज्जाक शेख, शरद बारहाते यांच्यासह साधन व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

## पोस्को, अत्याचार प्रकरणातील आरोपीस जिल्हा न्यायालयातून जामीन मंजूर

**ॲड. शेख इम्रान यांच्या युक्तिवादाने फिरली बाजू**

बीड । प्रतिनिधी

मौजे चकलांबा, ता. गेवराई येथील पोस्को कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपीस बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला असून, आरोपीच्या बाजूने करण्यात



आलेला ॲड. शेख इम्रान यांचा प्रभावी युक्तिवाद निर्णायक ठरला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, ८ जून २०२४ रोजी पीडित मुलीच्या आईने चकलांबा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीनुसार, ६ जून रोजी ती मेंढ्या चरण्यासाठी गेली असताना तिची मुलगी पीडीता घरात एकटी होती. मात्र संध्याकाळच्या सुमारास मुलगी बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले. तपासादरम्यान संबंधित पीडीता आरोपी कृष्णा लहू शिंदे याच्यासोबत मिळून आल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३, ३७६, ३७६(२) (एम) तसेच पॉक्सो कायद्यातील कलम ४ व ६ अंतर्गत गुन्ह्यात कलमवाढ करून कारवाई केली.

या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला दिनांक ६ मे २०२६ रोजी अटक केली होती. त्यानंतर न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पुढे दिनांक ८ मे २०२६ रोजी आरोपीची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. दरम्यान, आरोपीच्या वतीने विधीज्ञ ड. शेख इम्रान यांनी बीड जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल करत सविस्तर आणि कायदेशीर मुद्द्यांवर आधारित युक्तिवाद मांडला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड. शेख इम्रान यांना ॲड. सूर्यकांत पवार, ॲड. पंकज रायभोळे, ॲड. शेख अनवर तसेच इबाद शेख यांनी सहकार्य केले.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. ※वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com